महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १८० वा | दिनांक : २१/०४/२०२५ | वार : सोमवार

## भारतीय भाषेला विरोध करत इंग्रजीचे गोडवे गाणे, याचे वाईट वाटते : देवेंद्र फडणवीस



**पुणे** : महाराष्ट्रात सध्या मराठी आणि हिंदी भाषेचा वाद सुरू आहे. हिंदीच्या सक्तीला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने विरोध केला आहे. या पार्श्वभूमीवर मनसे नेते संदीप देशपांडे यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांना पत्र देखील पाठवले आहे.

या पत्रातून त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. यावर तोडगा काढण्याची देखील मागणी या पत्रातून करण्यात आली आहे. या सगळ्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. हिंदी भाषा कुठेही लादली जात नाहीये, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

पत्रकारांशी बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, मराठीच्या ऐवजी हिंदीची सक्ती करण्यात आलेली नाही. तीन भाषा शिकणे अनिवार्य आहे. त्यातील दोन भारतीय भाषा असल्या पाहिजेत. आता आपल्याकडे दोन भाषा कोणत्या तर एक मराठी आहेच त्यासोबत आपण हिंदी भाषा घेतली आहे. मल्याळम किंवा इतर अशा भाषा ठेवल्या तर त्याचे शिक्षक आपल्याकडे उपलब्ध नाहीत. तसेच कोणाला हिंदीच्या व्यतिरिक्त दुसरी भाषा शिकायची असेल तर आम्ही त्याची सोय करू. २० च्या वर विद्यार्थी असतील तर शिक्षक दिला जाईल, कमी असतील तर ऑनलाईन पद्धतीने भाषा शिकवली जाईल. पण हिंदी लादण्याचा प्रयत्न होत आहे, हे म्हणणे चुकीचे आहे. मला एका गोष्टीचे वाईट वाटते, आपण आपल्या देशाच्या हिंदी भाषेला विरोध करतो आणि इंग्रजी भाषेचे गोडवे गातो, अशी खंत देखील यावेळी बोलताना फडणवीस यांनी व्यक्त केली आहे.

## समीर भुजबळ अजित पवारांनी हुसकलेला माणूस : सुहास कांदे

**नाशिक** : विधानसभा निवडणुकीपूर्वी राष्ट्रवादी कांग्रेस अजित पवार गटाचे समीर भुजबळ यांनी मुंबई शहराध्यक्ष पदाचा राजीनामा दिला होता. तसेच नांदगाव विधानसभा मतदारसंघ भयमुक्त करण्यासाठी निवडणूक लढवण्याची देखील त्यांनी घोषणा केली होती.

आता रविवारी प्रसारमाध्यमांशी बोलताना, मी विधानसभा निवडणुकीच्या आधीच राजीनामा दिला होता, मात्र तो अद्याप स्वीकारला नाही, असे विधान केले आहे. समीर भुजबळ यांनी केलेल्या या दाव्यावर नांदगावचे आमदार सुहास कांदे यांनी जोरदार टीका केली आहे. समीर भुजबळ यांनी केलेल्या या दाव्यावर टीका करताना सुहास कांदे म्हणाले, समीर भुजबळ हा अजित पवारांकडून हुसकलेला माणूस आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी समीर भुजबळ यांचा राजीनामा स्वीकारलेला होता. महायुतीच्या विरोधात ज्यांनी कामे केली, त्या सगळ्यांचीच हकालपट्टी केली जाईल, असे ठरलेले होते. भाजप, सेना, राष्ट्रवादीत असे अनेक उदाहरणे आहेत. ईडी, सीबीआय यापासून वाचण्यासाठी समीर भुजबळ अजित पवारांच्या पुढे-पुढे करत आहेत. एखाद्या प्राण्याला हुसकल्यावर कसे ते पुन्हा-पुन्हा येतात, तसे समीर भुजबळांचे उदाहरण आहेत.

## राज-उद्धव एकत्र आले तर मला फार आनंद होईल : छगन भुजबळ



**नाशिक** : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना ठाकरे गटाचे अध्यक्ष उद्धव ठाकरे युती करणार असल्याची चर्चा सध्या महाराष्ट्रात सुरू आहे. राज ठाकरे एका मुलाखतीत बोलताना म्हणाले होते, महाराष्ट्राचे कल्याण होणार असेल तर कौटुंबिक भांडणासारख्या क्षुल्लक गोष्टी मी विसरून पुढे जाईल, असे म्हटले होते. तसेच यावर उद्धव ठाकरे यांनी देखील भांडण बाजूला ठेवायला तयार असल्याचे भाषणात म्हटले होते. या सगळ्यावर राष्ट्रवादी कांग्रेस अजित पावर गटाचे नेते छगन भुजबळ यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

छगन भुजबळ म्हणाले, मी बाळासाहेबांसोबत जवळून काम केले आहे. राज ठाकरे वेगळे होत आहेत, हे कळल्यावर मी १२ वर्षे शिवसेना सोडली, पण कोणाशी बोललो नाही. हे कळल्यावर मी स्वतः राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांना फोन केला. मी त्यांना आठ दिवस शांत राहण्यास सांगितले. ते शांत राहिले, पण दुर्दैवाने जे व्हायचे ते झाले. त्यामुळे जर आता ते दोघे एकत्र आले, तर मला खुप आनंद होईल. माझा पक्ष वेगळा आहे. मी बाळासाहेबांच्या काळातच बाहेर पडलो. पण आमचे शिवसेनेबद्दलचे प्रेम कमी झालेले नाही. सर्व कुटुंब एकत्र आले, तर खुप चांगले होईल. महाराष्ट्रात मनसे आणि शिवसेना ठाकरे गट एकत्र आले तर याचा परिणाम काय होईल, असा प्रश्न विचारला असता छगन भुजबळ म्हणाले, निश्चितपणे याचा परिणाम होईल. शिवसेनेची ताकद वाढेल. दोन कार्यकर्ते एकत्र आले, तरी ताकद वाढल्यासारखे वाटते. हे तर मोठे नेते आहेत. एखादा पडलेला आमदार जरी पक्षात आला, तरी ताकद वाढते, असे भुजबळ यांनी उत्तर दिले आहे.

पुढे बोलताना छगन भुजबळ म्हणाले, कार्यकर्त्यांची इच्छा असते आणि ते थेट बोलू शकत नाहीत, म्हणून प्रेमापोटी बॅनर लावतात. त्याचा फारसा परिणाम होत नाही. तुमच्याकडे बातम्या सुरू झाल्या की परिणाम होतो, हे खरे आहे. तसेच माझे आयुष्य अजित पवारांवर सोपवले आहे कार्यकर्ते कधी कधी बॅनर लावतात, असेही भुजबळ यावेळी म्हणाले आहेत.

## ज्या पक्षाने मोठे केले त्याच्यावर आरोप करायचे नसतात : नाना पटोलेंचा संग्राम थोपटेंना सल्ला



**नागपूर** : कॉंग्रेस पक्षात मला सातत्याने डावलण्याचा प्रयत्न करण्यात आला असल्याचा आरोप कॉंग्रेसचे माजी आमदार संग्राम थोपटे यांनी केला आहे. कॉंग्रेस पक्षाच्या राजीनामा दिल्यानंतर त्यांनी आज आपण भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याचे अधिकृत जाहीर केले आहे. यावर आता कॉंग्रेस नेते नाना पटोले यांनी प्रतिक्रिया देत संग्राम थोपटे यांना सल्ला दिला आहे.

नाना पटोले संग्राम थोपटे यांना उद्देशून म्हणाले, ज्या पक्षाने तुम्हाला मोठ केले, नावारुपाला आणले त्याच्यावर आरोप करायचे नसतात. जिकडे तुम्ही जाऊ पाहता तिकडे फार अंधार आहे, असे नाना पटोले यांनी म्हटले आहे. दरम्यान, २२ एप्रिल रोजी आपण भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याचे संग्राम थोपटे यांनी जाहीर केले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत प्रवेश सोहळा २२ एप्रिल रोजी मुंबईत होणार असल्याचे देखील त्यांनी सांगितले आहे.

कॉंग्रेस पक्षात आपल्याला अनेकदा डावलण्यात आले असल्याचा आरोप संग्राम थोपटे यांनी केला आहे. कॉंग्रेस पक्षात अनेक वर्षांपासून मी आणि माझ्या वडिलांनी देखील काम केले आहे. त्यामुळे दुःख वाटत आहे. मात्र तालुक्याच्या विकासासाठी, तालुक्यातील प्रश्न सोडवण्यासाठी हा निर्णय आम्ही घेतला असल्याचे संग्राम थोपटे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

मी कोणाच्याही दबावाला कधी बळी पडलो नाही. लोकसभा निवडणुकीत देखील तुम्ही पाहिले असेल की, भोर तालुक्यात लोकसभेच्या निवडणुकीत देखील महा विकास आघाडीचे काम आम्ही प्रामाणिकपणे केले होते. महा विकास आघाडीचा धर्म पाळत आम्ही महा विकास आघाडीचे काम केले. आम्ही काम केले म्हणजे कोणावर उपकार केले नाहीत. मात्र, जे केले ते सांगायला काही हरकत नसल्याचे थोपटे यांनी म्हटले आहे. इतरही अनेक जबाबदारी मला पक्षाने दिली. त्या सर्व जबाबदाऱ्या आपण पार पाडल्या असल्याचे थोपटे यांनी म्हटले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २१ एप्रिल २०२५

## महानगरपालिका प्राथमिक व माध्यमिक विद्यालय मुकुंदवाडी शाळेतील विद्यार्थ्यांचे बॉक्सेस स्पर्धेत यश



**छत्रपती संभाजीनगर :** मनपा कम्युनिटी सेंटर सिडको एन २ येथे १५ व्या महाराष्ट्र स्टेट लेवल ऑल केनपो काई मार्शल आर्ट्स द्वारा आयोजित केलेल्या स्पर्धेमध्ये मनपा कें. प्रा. शाळेचे विद्यार्थी चि.युवराज नवनाथ काळे आणि चि. शिवराज गजानन बोर्डे (वर्ग ८ वी) या दोघांना स्पर्धेमध्ये सुवर्णपदक मिळाले.

यावेळी स्पर्धेचे उद्घाटक मुख्याध्यापक श्री के. बी. चौधरी तर प्रमुख अतिथी म्हणून श्री सचिन गायकवाड उपस्थित होते.

## फुले-आंबेडकरी वाङमय कोशाला केवळ एका भाषेपुरते मर्यादित ठेवता येणार नाही : डॉ. मुस्तजीब खान





**छत्रपती संभाजी नगर :** आजच्या काळात पुस्तक उघडून बघण्याची सवय संपत चाललेल्या या विज्ञान तंत्रज्ञान मोबाईल इंटरनेट एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका सारख्या अनेक ऑनलाईन प्लॅटफॉर्म उपलब्ध असल्या असणाऱ्या काळात फुले आंबेडकर संशोधक आणि अभ्यासकासाठी या कोशाची निर्मिती वैशिष्ट्यपूर्ण ठरणार आहे असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. मुस्तजीब खान यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषदेने आयोजित केलेल्या फुले आंबेडकरी वांग्मय कोश चर्चा आणि चिंतन या विषयावर आपले विचार मांडताना त्यांनी याप्रसंगी केले.

यावेळी मंचावर या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. ऋषिकेश कांबळे फुले आंबेडकर वांग्मय कोशाचे संपादक डॉ. महेंद्र भवरे डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषदेचे अध्यक्ष डॉ. मोहन सौंदर्य डॉ. सुनिता सावरकर आदींची उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ.खान म्हणाले की वांग्मय कोशाने संपूर्ण वाङ्मयाची एकूणच ऐतिहासिक पार्श्वभूमी डोळ्यासमोर ठेवून या ग्रंथाची निर्मिती संपादक मंडळांनी केली असून हा फुले आंबेडकरी वांग्मय कोश हा नक्कीच संशोधन आणि अभ्यासासाठीचा पाया ठरतो त्यामुळे या कोशाला केवळ एका भाषे पुरते मर्यादित न ठेवता या वांग्मयकोशाची सीमा सगळ्याच भाषेसाठी खुला खुल्या करण्यात असे आवाहन याप्रसंगी केले सुरुवातीला या ग्रंथावर प्रसिद्ध संशोधिका डॉ. सुनिता सावरकर यांनी व्यक्त करताना म्हटले की कोणतेही समाजात आत्मभान निर्माण झाल्याशिवाय वांग्मय कोश निर्माण होऊ शकत नाही कारण फुले आंबेडकरी वांग्मय कोशातील मुलगामी नोंदी या पुढील साहित्य चळवळीला पोषक असा साहित्य ठेवा असण्याचे प्रतिपादन करून या कोशात महाराष्ट्रातील विविध घटना घडामोडींची नोंद या कोशात असल्यामुळे या वामनकोशाला एक मोठा इतिहास प्राप्त झाला असल्याचे गौरव उद्गार त्यांनी या कोशावर आपले विचार व्यक्त करताना केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरून आपले अध्यक्षीय समारोप करताना डॉ.ऋषिकेश कांबळे यांनी महाराष्ट्रातील वांग्मयीन चळवळीचा वेध घेताना म्हटले की वाङमय कोश केवळ माहितीचा स्त्रोत नसून महाराष्ट्रातील सगळ्यात साहित्य संस्कृतीचा हा कोर्स ठेवा ठरतो असे मला प्रामुख्याने वाटते कारण या ग्रंथात महात्मा फुले पूर्व दलित बहुजन समाजातल्या चळवळी त्यांची लेखन यातून चळवळीला किंवा फुले आंबेडकरी चळवळीला ज्या ज्या म्हणून गोष्टींचा आढावा ऐतिहासिक पार्श्वभूमीला समोर ठेवून लिहिल्या गेल्यामुळे अशा सर्वच वांग्मयीन कृती प्रवृत्तीचा संचित म्हणून या ग्रंथाकडे अभ्यासकांनी बघावे असे प्रतिपादनही त्यांनी आपल्या अध्यक्षीय समारोपात डॉक्टर कांबळे यांनी केले.

त्याचबरोबर या कोषासंदर्भात डॉक्टर कांबळे यांनी अनेक फुले आंबेडकरी चळवळी संबंधी केलेले विवेचन या कोशाचे खास वैशिष्ट्य असल्याचे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले.

यावेळी कार्यक्रमाला प्रसिद्ध विचारवंत डॉ. जयदेव डोळे, प्रा. मंगल खिवंसरा, कवी राम दूतोंडे, कथाकार उत्तम बावस्कर, डॉ. अशोक इंगळे, डॉ. भास्कर पाटील, डॉ. श्रीकृष्ण मोरे, डॉ. बाळासाहेब लिहिणार, डॉ. संजय पाईकराव, डॉ. श्रीधर नांदेडकर, डॉ. बाळासाहेब गायकवाड, धनंजय रायबोले, डॉ. सतीश वाघमारे, डॉ. मिलिंद वाहुळे, प्रकाश कांबळे, डॉ. विद्या म्हस्के, बॅरिस्टर शिवाजी डोळसे, डॉ. शिवाजी डोळसे, कवी नातू पोगे, लेखक धनराज गोंडाने सह शहरातील साहित्य रसिक श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन या ग्रंथाचे संपादक मंडळावरील सदस्य प्रा. ज्ञानेश्वर कांबळे यांनी तर कार्यक्रमाचे आभार डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषदेचे अध्यक्ष डॉ. मोहन सौंदर्य यांनी मांडले. या कार्यक्रमासाठी पंकज शिंदे तसेच परिषदेचे सर्व पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले




## जर्मनी येथे होणाऱ्या वर्ल्ड युनिव्हर्सिटी बॅडमिंटन स्पर्धेच्या निवड चाचणीसाठी संत तुकाराम महाविद्यालयातील नागेश चामले याची निवड



**कन्नड :** जर्मनी येथे जूलै २०२५ मध्ये होणाऱ्या वर्ल्ड युनिर्व्हसिटी बॅडमिंटन टूर्नामेंटसाठी भारतातील ऑल ईंडिया खेळलेल्या पहिल्या पाच विद्यापीठाच्या खेळाडूंची निवड करण्यात येणार आहे.

यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ हे एक आहे. आपल्या विद्यापीठातून दोन खेळाडू वर्ल्ड युनिर्व्हसिटीच्या सिलेक्शन ट्रायलसाठी जाणार आहेत. ही निवड चाचणी दिनांक १८ एप्रिल ते २१ एप्रिल दरम्यान उडीसा भुवनेश्वर येथे होत होत आहे.

या वर्ल्ड युनिर्व्हसिटी सिलेक्शन ट्रायलसाठी आपल्या महाविद्यालयाचा बॅडमिंटनचा उत्कृष्ट खेळाडू नागेश भरत चामले याची निवड झाली आहे.

वर्ल्ड बॅडमिंटन युनिर्व्हसिटीसाठी निवडला गेलेला तो आपल्या महाविद्यालयाचा पहिला खेळाडू आहे. त्याच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार किशोर पाटील संस्थेचे उपाध्यक्ष प्रदीपजी निजामपूरकर, संस्थेचे कोषाध्यक्ष त्रिंबकरावजी करडेल, संस्थेचे संचालक श्री. विश्वास बापू मोतींगे, संस्थेचे सरचिटणीस एडवोकेट प्रसन्ना पाटील, संस्थेचे संचालक श्री. सिद्धार्थ पाटील, महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सुनिता देशमुख क्रीडा विभाग प्रमुख डॉ. सुहास यादव, या सर्वांनी त्याचे अभिनंदन केले आणि पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २१ एप्रिल २०२५


## रडणारं नसुन भिडणारं लिहा : कवी सुनील उबाळे



**जालना :** मुद्रा साहित्य मंच आणि सुभद्राबाई काळे परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने जालना येथे कवी सुनील उबाळे यांना सुभद्राबाई काळे राज्यस्तरीय काव्य पुरस्कार जेष्ठ साहित्यिका आदरणीय रेखा बैजल यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. भास्करराव आंबेकर, भास्कर आबा दानवे, रमेश देहेडकर सरबंडू काळे, कैलास भाले, सुहास पोतदार, सुनील लोणकर, डॉ. राज रणधीर, एकनाथ शिंदे, कृष्णा कदम, गणेश खरातांसह अनेक मान्यवर रसिक आणि कवी उपस्थित होते.

सुनील उबाळे हा व्यवस्थेशी भिडणारा कवी असुन तो कष्टकऱ्यांच्या नोंदी टीपत राहतो असे वक्तव्य जेष्ठ साहित्यिका रेखा बैजलांनी आदोरेखीत केले.

सुहास पोतदारांनी सुनील उबाळे यांच्या कविता जन सामान्य माणसांच्या कविता असुन उलट्या कडीचं घर हा कविता संग्रह प्रत्येक माणसाला आपला वाटणारा आहे असं ते संग्रहावर भाष्य करताना म्हणाले.

पुरस्काराला उत्तर देताना सुनील उबाळे आजीच्या आठवणीने गहिवरून गेले होते ते म्हणाले हा पुरस्कार माझा एकट्याचा नसून माझ्या समकालीन लिहिणाऱ्या तमाम मित्रांचा व आजीचा आहे.

ते पुढे म्हणाले माझी कविता सामन्य माणसं कामगार आणि कवी मित्रांच्या पाठीवर उभी राहुन मोठी झाली असुन तिचा कुठलाच गॉडफादर नाही याचा मला मनस्वी आनंद आहे भोसले सरांच्या सुत्रसंचलनामुळे कार्यक्रमाला उंची प्राप्त झाली होती काळे परिवारा तर्फे आभार व्यक्त करण्यात आले

## फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने शतकोत्तर वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे आयोजन

**छत्रपती संभाजी नगर :** आपण सर्वांनाच ज्ञात आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २० एप्रिल १९५४ ला म्हटले होते की, "निवडणूकीद्वारे जागा मिळविणे हे एक साधन आहे, साध्य नव्हे!" तसेच २० एप्रिल १९३८ ला म्हटले होते की, "तुमची मते विकू नका, ती सत्कार्यी लावा."

त्या दोन्ही विधानाच्या अनुक्रमे ७१ व्या व ८७ व्या वर्धापनदिनानिमित्त विषय : निवडणूकीद्वारे जागा मिळविणे हे एक साधन आहे, साध्य नव्हे! म्हणून तुमची मते विकू नका, ती सत्कार्यी लावा. या विषयावर फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने १०५ व्या वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे दिनांक २० एप्रिल २०२५, रविवारला दुपारी २:३० वाजता आयोजन करण्यात आले आहे.

तरी आपण सर्व मानवतावादी व्यक्तींनी फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे जणसंपर्क कार्यालय : प्लॉट क्रमांक : ४, साकेत नगर, भावसिंगपुरा रोड, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र. येथे उपस्थित राहावे. या कार्यशाळेला संविधान लोकशिक्षण अभियानाचे संचालक : एड. विजय जाधव हे उद्घाटनपर मार्गदर्शन करणार आहेत.

तर सामाजिक कार्यकर्ते सुभाष ठोकळ हे विशेष मार्गदर्शन करणार असून सामाजिक कार्यकर्ते अरविंद कांबळे हे प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. ही कार्यशाळा संचालक बी. बी. मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. सर्व उपस्थित प्रतिनिधींना या कार्यशाळेत आपले मत व्यक्त करण्याची संधी दिली जाणार आहे.

तरी सर्व मानवतावादी नागरिकांनी फुले आंबेडकर जयंती निमित्त आयोजित या कार्यशाळेला उपस्थित राहून आपले म्हणणे उपस्थितांना समजावून सांगावे, पटवून द्यावे आणि इतरांचे म्हणणे समजून घ्यावे.

करिता १०५ व्या शतकोत्तर वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. असे फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने कळविण्यात आले आहे.






## रक्तदान करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अनोखे अभिवादन...



**मुरूम, ता. उमरगा, (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीच्या निमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मंडळ व डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, यशवंत नगर यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिर शुक्रवारी (ता. १८) रोजी आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी शहरातील ७५ रक्तदात्यांनी रक्तदान केले. या शिबिराचे उद्घाटन जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापूराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी नगराध्यक्ष धनराज मंगरुळे, रशीद गुतेदार, महालिंग बाबशेट्टी, सतिश सावंत आदींची उपस्थिती होती. यावेळी मंडळाचे अध्यक्ष बसवराज हावळे, उपाध्यक्ष आशुतोष गायकवाड, सचिव अमित देडे, सहसचिव डॉ. अजिंक्य मुरूमकर, जिल्हा कृषी पणन तज्ञ अमित भालेराव, प्राचार्य आकाश गवई, माजी नगरसेविका संध्या सावंत, माजी नगरसेविका मीरा सोमवंशी, मुख्याध्यापिका उर्मिला तुपेरे, अश्विनी कांबळे, तृप्ती गायकवाड, आनंद कांबळे, किरण गायकवाड, आशिष गवई, उत्कर्ष गायकवाड, वैभव कांबळे, प्रशांत कांबळे, सुरज कांबळे, शुभम सावंत, अमर भालेराव, प्रविण सुर्यवंशी, मलकेश वाघमारे, किशोर सुरवसे, समीर सोमवंशी, विवेक भालेराव, प्रसाद बनसोडे, संतोष कांबळे, अभिजीत कांबळे आदींनी पुढाकार घेतला. मातोश्री डी एम एल टी कॉलेजचे विद्यार्थी,श्रीकृष्ण रक्तपेढीचे डॉ. सागर पतंगे, विजय केवडकर, योगेश सोनकांबळे, किशोर खरोसे ऋतिक मेत्रे, अजय रोडगे, राहुल कांबळे आदींनी रक्त संकलनाचे काम पाहिले. अशा समाज उपयोगी उपक्रमामुळे डॉ. आंबेडकर यांच्या समाजसेवेच्या विचारांना आणि मानवतेच्या मूल्यांना खऱ्या अर्थाने अभिवादन करण्यात आले. रक्तदानानंतर सहभागी रक्तदात्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले. या उपक्रमाने सामाजिक एकतेचा आणि मानवतेचा संदेश दिल्याने परिसरातील नागरिकांमधून कौतुक करण्यात येत आहे

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २१ एप्रिल २०२५


## माणुसकी कुठे दिसत नाही

मी कोणालाच काही बोलत नाही
कोणला काही सांगतही नाही
मी अन्यायाविरुद्ध बोलतो, लढतो,लिहितो
म्हणून तर अनेकांच्या डोळ्यात सलतो

आजकाल जे जे जनहिताचे आहे
त्या विरुद्ध लोकांना नफरत आहे
कुणाचंही वाईट कसं करता येईल
याविषयीच इंटरेस्ट जास्त आहे

जो दुसऱ्यांचा विचार करतो
त्याला आयरी गहिरी समजतात
जो फक्त बिनकामी गोड बोलतो
त्याचाच इथे सन्मान केला जातो

माणसातल्या वाईट प्रवृत्त्या
आजकाल बळावत आहेत
सत्याच्या बाजुने कुणी चालला तर
त्याला वाळीत टाकले जात आहे

हल्ली रहावे कसे नी कुठे
काही कळेनासे झाले
जिकडे तिकडे भयभीत वातावरण
मन कुठे रमत नाही

हल्ली माणुस आता
कुठेच सुरक्षित दिसत नाही
जात्यांध आणि धर्मांध राजकारण्यांना
माणुसकी कुठे दिसत नाही

इतके आक्रमक होतो आम्ही
सत्तेसाठी आणि धर्मासाठी
माणुस रोज मारला जातो इथे
मानवतेसाठी का झटत नाही कुणी ?


**कवी**
**प्रा. डॉ. सतीश मस्के**
**मो.९४२३३९७४८४**


## खेळाडू खिशात पैसे घेऊन धावू शकत नाही. त्याने त्याच्या हृदयात आशा आणि त्याच्या डोक्यात स्वप्ने घेऊन धावले पाहिजे : डॉ.अ. करीम सालार




**जळगाव** : महाराष्ट्र टेनिस बॉल क्रिकेट असोसिएशनच्या वतीने नागपूर येथे १४ व १७ वर्षा आतील वयोगटातील सब-ज्युनिअर राज्यस्तरीय टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा होत आहे.

यासाठी जळगाव जिल्हा मुले/मुलींचा संघ निवडण्यासाठी निवड चाचणीचे आयोजन रविवार दि.१३ रोजी दुपारी ४.०० वाजता सेंट्रल रेल्वे स्कूल, रेल्वे हॉस्पिटलच्या पुढे,भुसावळ येथे करण्यात आले होते.

या चाचणीत इकरा पब्लिक शाळेतील तलहा देशमुख,काजिम मणियार (अंडर १७) उमर बागवान,जैद शेख,अबुबकर व फरहान पिंजारी (अंडर १४) यांनी उत्तम कामगिरी केली व चाचणीत यश मिळवले.

राज्यस्तरीय स्पर्धा नागपूर येथे २४ ते २६ एप्रिल दरम्यान होणार आहे.निवडलेले विद्यार्थी जळगाव जिल्हा संघाकरिता सेंट मेरी स्कूलच्या ग्राउंड,नागपूर येथे प्रतिनिधित्व करतील.

सर्व खेळाडू आणि क्रीडा शिक्षक आमीर खान यांच्या यशाबद्दल इकरा संस्थेचे अध्यक्ष डॉ.अ.करीम सालार, उपाध्यक्ष डॉ.इकबाल शाह, सचिव एजाज मलिक, इरफान सालार प्राचार्य एस.एस.शेख, आणि सर्व शिक्षकवृंद यांनी अभिनंदन केले आहे.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


## मुख्यमंत्री होण्यासाठी उद्धव व राज दोघेही राजकीय अनफिट : गुणरत्न सदावर्तें

**मुंबई** : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना ठाकरे गटाचे अध्यक्ष उद्धव ठाकरे युती करणार असल्याची चर्चा सध्या महाराष्ट्रात सुरू आहे. राज ठाकरे एका मुलाखतीत बोलताना म्हणाले होते, महाराष्ट्राचे कल्याण होणार असेल तर कौटुंबिक भांडणासारख्या क्षुल्लक गोष्टी मी विसरून पुढे जाईल, असे म्हटले होते. तसेच यावर उद्धव ठाकरे यांनी देखील भांडण बाजूला ठेवायला तयार असल्याचे भाषणात म्हटले होते. यावर आता अनेकांच्या प्रतिक्रिया येणे सुरू झाले आहे. यात वकील गुणरत्न सदावर्ते यांनी देखील आपले मत मांडले आहे.

गुणरत्न सदावर्ते म्हणाले, सबकुछ फिल्मी हैं, स्वत: प्रोडक्शन काढणे आणि महेश मांजरेकरांना डायरेक्टर करणे, हे सगळे फुल टू फिल्मी आहे. हा ड्रामा सिरिअस सुद्धा मी म्हणणार नाही. दोन्ही राजकीय पक्षांचे काय अस्तित्व आहे. राज ठाकरेंची लोक विधानसभा आणि लोकसभेत आहे का? एक दोन इव्हेंट ते घेतात. उद्धव ठाकरे मामूजान, भाईजान करतात, किती त्यांना समजले आणि किती न्याय हक्कासाठी ते उभे राहातात सर्वांना माहिती आहे. वक्फमुळे लोकांना त्रास होतोय. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे दोन्ही किरकोळ, काय होलसेल दुकान उघडणार आहे का? कोणता ब्रँड? चिन्ह टिकू शकते का? किती मते आहेत? असे सवाल सदावर्ते यांनी उपस्थित केले.

राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांचे संभाव्य युतीवर प्रश्न विचारला असता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उत्तर देणे टाळले होते. यावर बोलताना गुणरत्न सदावर्ते म्हणाले, एकनाथ शिंदे यांची बोलकी प्रतिक्रिया आहे. कामाचे बोल, यांच्यावर टाइम घालवणे चुकीचे आहे. हे करमणूक करणारे आहेत. बँक आंदोलन मागे घ्यावे लागले, हिंदी भाषा सक्तीविरोधात बोलले. तालिबानी देश नाही आहे. राज ठाकरेंनी स्वतः २००८ साली बोलले होते की हिंदी राजभाषा आहे. राज ठाकरेंचे हे आंदोलन फेल जाणार. अशात नवीन प्रॉडक्ट महेश मांजरेकर यांना मार्केटमध्ये आणून चालेल का? म्हणून आणले असेल.

गुणरत्न सदावर्ते म्हणाले, राज ठाकरे आणि उद्धव ठाकरेंनी सोयाबीन आणि शेतीवर बोलून दाखवावं, लोकांना गोष्टी समजल्या आहेत. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरेंना पॉलिटिकल सायकॉलॉजिस्टची गरज आहे. हे राजकीय वेडेपण आहे, काय करु, काय करु, कसे करु, कसे करु यांचे सुरु आहे. हे दोघेही राजकीय अनफिट आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २१ एप्रिल २०२५


## डॉ.आंबेडकरांची आमुलाग्र परिवर्तनाची दृष्टी आणि प्रजासत्ताकवादाचे आदर्श

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वराज्याच्या संकल्पनेने ऐतिहासिकदृष्ट्या उपेक्षित आणि वंचित राहिलेल्या समाजाच्या बाजूने सामाजिक आणि राजकीय संरचनांमध्ये आमूलाग्र परिवर्तन घडवून आणण्याची मागणी केली. हे परिवर्तन केवळ सत्ता बदलापुरते मर्यादित नव्हते, तर सामाजिक न्यायावर आधारित एका नवीन, समतावादी समाजाच्या निर्मितीची आकांक्षा बाळगणारे होते.

दुर्दैवाने, आजच्या राजकीय आणि सामाजिक परिस्थितीत, आंबेडकरांच्या या क्रांतिकारी दृष्टिकोनाला फारच थोडे लोक पाठबळ देणारे दिसून येतात.आज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती आहे. सामाजिक शास्त्रे या शाखेतील अभ्यासक त्यांना समान मानवी हक्कांच्या कल्पनेला पुढे नेणारे आणि सामाजिक विकासाच्या मूल्यांना समर्पित एक लोकशाही राष्ट्र म्हणून भारताच्या उभारणीसाठी महत्त्वपूर्ण योगदान देणारे व्यक्तिमत्व म्हणून गौरवाने पाहतात. आंबेडकर हे स्वतंत्र भारताच्या संविधानाचे दूरदृष्टीचे शिल्पकार म्हणून सर्वदूर ओळखले जातात.

या संविधानाने सत्ता आणि विशेषाधिकार प्राप्त वर्गांमध्ये उपेक्षित सामाजिक समूहांना सामावून घेणाऱ्या सर्वसमावेशक शासकीय धोरणांचा पाया रचला. भारताला एक आधुनिक लोकशाही राष्ट्र बनवण्यात आंबेडकरांचे योगदान किती महत्त्वाचे आहे, हे यावरून स्पष्ट होते. तथापि, त्यांच्या 'स्वराज' या संकल्पनेतील मूलभूत राजकीय विचार अनेकदा दुर्लक्षित केले जातात आणि त्यामुळे त्यांचे संपूर्ण मूल्यांकन अपूर्ण राहते. 'स्वराज'च्या त्यांच्या दृष्टिकोनात सामाजिकदृष्ट्या उपेक्षित समूह राजकीय सत्ता आणि वर्गीय विशेषाधिकारांचे नवीन दावेदार म्हणून उदयास येण्याची कल्पना होती. आंबेडकरांनी केवळ राजकीय स्वातंत्र्य पुरेसे मानले नाही, तर सामाजिक आणि आर्थिक स्वातंत्र्यही तितकेच महत्त्वाचे मानले. त्यांच्या मते, जर समाजातील दुर्बल घटकांना सामाजिक समानता आणि आर्थिक संधी मिळाल्या नाहीत, तर राजकीय स्वातंत्र्य असूनही ते खऱ्या अर्थाने स्वतंत्र होऊ शकणार नाहीत. त्यांनी पारंपरिक सत्ताधारी वर्गाला आव्हान दिले आणि शोषित वर्गाला आत्मसन्मानाने जगण्याचा आणि आपले हक्क मिळवण्याचा मार्ग दाखवला.

त्यांच्या 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' या प्रसिद्ध घोषणेमधून सामाजिक बदलासाठी कृतीशीलतेचे महत्त्व स्पष्ट होते. आंबेडकरांनी केवळ कायद्याच्या चौकटीत बदल घडवण्यावर भर दिला नाही, तर त्यांनी सामाजिक मानसिकता बदलण्याची आणि जातीय भेदभावासारख्या रूढ झालेल्या अन्यायकारक प्रथांना मूठमाती देण्याची आवश्यकता प्रतिपादित केली. त्यांनी सामाजिक समानतेच्या कल्पनेला बळकटी देण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. श्रेणीबद्ध आणि जुलमी/ दडपशाही जातीभेदावर आधारित पारंपरिक विषम सामाजिक व्यवस्था ही मानवी स्वातंत्र्य आणि आत्मसन्मानाच्या आधुनिक मूल्यांशी मुळातच पूर्णपणे विसंगत आहे, हे त्यांनी स्पष्टपणे ओळखले.

जवाहरलाल नेहरूंसारख्या प्रमुख राष्ट्र निर्मात्यांसोबत, डॉ.आंबेडकरांनी अशी आशा व्यक्त केली होती की, समान अधिकार आणि नागरिकत्वाचा आधुनिक दृष्टिकोन पारंपरिक जाती आधारित विभागणी नष्ट करेल आणि ज्यामुळे व्यक्तींना मुक्त प्राणी म्हणून त्यांची पूर्ण मानवी क्षमता विकसित करता येईल. नवीन राज्याची जबाबदारी केवळ प्रशासकीय कार्ये पार पाडण्यापुरती मर्यादित नसून, एक संरक्षक संस्था म्हणून काम करणे आणि सामाजिक परिवर्तनाचा नैतिक भार उचलणे ही आहे.

यावर डॉ. आंबेडकरानी हे मान्य केले की, भारतातील सामाजिक जीवन सरंजामशाही आणि ब्राह्मणवादी संरचनांनी भारलेले आहे, ज्यामुळे उपेक्षित गटांवर सतत अन्याय होत आहे. त्यामुळे, राज्याने सामाजिक आणि वर्ग असमानता दूर करणे आवश्यक आहे, आणि या गटांचे कल्याण आणि सक्षमीकरण करण्यासाठी आपल्या सर्व संस्था सक्रिय करणे आवश्यक आहे. केवळ समानता सुनिश्चित करण्यापलीकडे, राज्यावर असुरक्षित समुदायांना पारंपरिक सामाजिक नियमांमुळे होणारे नुकसान टाळण्याची आणि त्यांच्या सामाजिक-आर्थिक परिस्थितीत सुधारणा करण्यावर लक्ष केंद्रित करण्याची जबाबदारी होती.राज्याने वितरणात्मक न्यायतत्त्वांचे पालन करावे, ज्यामध्ये सर्वात वंचित गटांना दिलासा आणि समर्थन द्यावे, असे आवाहन डॉ.आंबेडकरांनी केले. या दृष्टिकोनातून, आधुनिक भारताची लोकशाही प्रक्रिया ऐतिहासिकदृष्ट्या उपेक्षित, विशेषत: अनुसूचित जाती आणि जमातींसाठी न्याय्य राजकीय प्रतिनिधित्वाच्या मूल्यावर आधारित होती.

आंबेडकरांनी सामाजिक न्यायाच्या धोरणांना प्रोत्साहन दिले, जसे की आरक्षण धोरण, ज्यामुळे उपेक्षित गटांना नवीन सत्ता संरचनांमध्ये संधी मिळू शकतील आणि ते नवीन सत्ता आणि विशेषाधिकारांचे वाहक म्हणून उदयास येतील, ज्यामुळे राज्य संस्था अधिक समावेशक आणि बहुलवादी बनतील. डॉ.आंबेडकरांनी पुरस्कार केलेला सामाजिक न्याय म्हणजे राज्य कारभारात उपेक्षित गटांचा समान सहभाग सुनिश्चित करणारी संस्थात्मक व्यवस्था तयार करणे हा होय.

डॉ.आंबेडकरांनी हे जाणले होते की, आधुनिक राष्ट्र-राज्याच्या प्रक्रियात्मक यंत्रणा केवळ सत्ता संरचनांमध्ये प्रतीकात्मक बदल घडवून आणू शकतात. सामाजिक अभिजनवर्गीयांच्या नियंत्रणाखालील संस्थांवर बहुसंख्यांच्या निष्क्रियता आणि अवलंबित्व यांना आव्हान देण्यासाठी, आंबेडकरांनी मुक्तीची एक क्रांतिकारी संकल्पना मांडली. त्यांच्या स्वराज्याची कल्पना प्रक्रियात्मक संस्थात्मक पद्धतींना पूरक असली तरी, ती त्यांना लोकशाही सक्रियतेसाठी अंतिम आदर्श म्हणून मान्यता देत नाही. त्याऐवजी, त्यांच्या स्वराज्याची संकल्पना प्रजासत्ताक लोकशाहीच्या परिवर्तनशील मूल्यांवर आधारित आहे, जी पूर्वीच्या दडपलेल्या वर्गांना सामाजिक आणि राजकीय बदलाचे अभिकर्ता म्हणून कार्य करण्यास सक्षम करेल.

आंबेडकरांनी दडपलेल्या समुदायांच्या एका संयुक्त शक्तीची कल्पना केली, जी आधुनिक जगात सत्ता टिकवून ठेवणाऱ्या पारंपरिक सामाजिक उच्चवर्गीयांच्या वैधतेला आव्हान देईल.प्रजासत्ताकवादाच्या मूळ अर्थानुसार, जुन्या अभिजनवर्गीय शासनाला (युरोपीय संदर्भात राजेशाहीचा ऱ्हास) उलथून टाकणे आणि संसदीय लोकशाहीसारख्या सत्तेच्या आधुनिक संस्था आयोजित करण्यास सक्षम असलेल्या सामूहिक शक्ती म्हणून लोकांचा उदय दर्शवतो. हे लोकांना आत्मजागरूक नागरिक म्हणून कल्पना करते, जे त्यांच्या निष्क्रिय अधीनतेबद्दल जागे झाले आहेत आणि आता पारंपरिक राजकीय अभिजनवर्गीयांना आव्हान देण्यास तयार आहेत. तथापि, आजच्या संदर्भात सामाजिक न्याय आणि लोकशाही प्रजासत्ताकवादाच्या मूल्यांवर आधारित आंबेडकरांच्या स्वराज्याच्या दृष्टिकोनाला फार थोडे समर्थक मिळतात.

नवउदारमतवादी आर्थिक धोरणांच्या वाढत्या प्रभावामुळे, राज्याने सर्वात वंचित गटांच्या कल्याणाची जबाबदारी झटकून देत आहे. दुसरीकडे हिंदुत्वाच्या सांस्कृतिक राष्ट्रवादाच्या राजकारणाने या उपेक्षित गटांना आपल्यात सामावून घेतले आहे. ज्यामुळे सामाजिक अभिजनवर्गीयांच्या वर्चस्वाला आव्हान देण्यासाठी बहुजन बॅनरखाली दलित, आदिवासी आणि ओबीसी एकत्र येण्याची शक्यता कमी झाली आहे. त्यामुळे, आंबेडकरांची स्वराज्याची संकल्पना आजच्या सामाजिक आणि राजकीय परिस्थितीत अत्यंत समर्पक ठरते आहे. कारण ती बहुसंख्यांची निष्क्रियता आणि त्यांचे परावलंबित्व अधोरेखित करते आणि अभिजन वर्गाच्या नियंत्रणातून मुक्त होण्यासाठी त्यांच्या सक्षमीकरणाची मागणी करते.


**मूळ लेखक**

**हरीश एस. वानखेडे**

हे नवी दिल्ली येथील जेएनयूच्या सेंटर फॉर पॉलिटिकल स्टडीजमध्ये प्राध्यापक असून दलित प्रश्नांचे अभ्यासक आहेत.

**मराठी अनुवाद :**

**प्रा.डॉ.प्रियदर्शन भवरे,**

बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना येथे समाजशास्त्राचे अध्यापन करतात.

संपर्क:

bhawarepriyadarshan@gmail.com


## वाढत्या शिक्षक आत्महत्त्या : शासन, प्रशासन आणि संस्थाचालक जबाबदार

आपल्या संस्कृतीमध्ये गुरु या शब्दाला आणि व्यक्तीला फारच महत्वाचे स्थान आहे .माणसाला माणूस म्हणून तयार करण्यामध्ये शिक्षकाची महत्वाची भूमिका आहे . शिक्षक समाजशील माणूस तयार करण्याचे कार्य करत असतो . school is mirror of the society.

समाज बदलत गेला तसा गुरु सुद्धा कालानुरूप बदलत आहे शिक्षक कभी सामान्य नही होता निर्माण और प्रलय उसके गोद मे पलते है असे आर्य चाणक्य म्हणतात. या गुरुना अनादी काळापासून राज सत्ता हेटाळणीचा सामना करावा लागला आहे आज सुद्धा हे सत्यच आहे . इसवी सन २००० साली शासनाने कायम विना अनुदानित धोरण लागू केले आणि शिक्षण क्षेत्राचे वाटोळे व्हायला सुरुवात झाली.

राज्यातील गोरगरीब शेतकरी शेतमजुर भूमिहीन बहुजनांचे लेकरे गुरुजी होता यावे म्हणून या कायम विना अनुदानित शिक्षण शाळेत लाखो रुपये डोनेशन देऊन शिक्षक झाले आणि खर्या अर्थाने मृत्यूच्या सापल्यात अडकले २००० साली कायम शाळा सुरू झाल्या आणि प्रचंड संघर्षानंतर २०१८ साली २०% पगार काही कर्मच्याऱ्यांच्या खात्यावर जमा व्हायला सुरुवात झाली आज २०२५ या सालात सुद्धा त्या शाळा १००% वेतन अनुदानावर आल्या नाहीत हीच खरी शोकांतिका आहे . या टप्प्याचं राजकारणात आणि आपल्यात कर्मचारी अडकला आणि त्यांची अवस्था चक्रव्यूहात अडकलेल्या अभिमन्यू सारखीच झाली . सरकार कोणाचे ही असो शिक्षक टप्पा ठप्पच राहिला .

या सर्वात भर म्हणून प्रशासन कायम त्यांच्या अडचणी वाढवते प्रशासन नोटाशिवाय चालतच नाही त्यामुळे शिक्षक आणखीन त्रस्त झाले माहिती मागविण्याच्या नावाखाली कागद गोळा करण्याचा प्रशासनाला छंदच झाला आहे.आजतगायतपर्यंत एकच माहिती पुन्हा पुन्हा मागण्याचा जागतिक विक्रम आपल्या राज्यात आहे पुन्हा मूल्यांकन पुनर्मुल्यांकन या गोंडस नावाखाली माहिती मागवण्याचा आणि नोटाचा भडीमार करायचा पण पुढचा टप्पा काही नाही द्यायचा. अंशतः अनुदानित शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी संसाराचा गाडा कसा ओढतात यावर महाभारतासारखा एक ग्रंथ तयार होऊ शकतो .शाळेत विद्यार्थ्यांना ज्ञानदान कार्य झाल्यानंतर हे कर्मचारी तुम्हाला वेगवेगळ्या भूमिकेत दिसतील .

वेटर, दुकानात, सिमेंट उचलणारा,चहाची टपरीवर कपबशी विसलतांना तरी या शासनाला आणि समाजाला जाग येत नाही संपूर्ण जगाच्या इतिहासात आणि वर्तमानात महाराष्ट्र सोडून २० २० वर्ष कामाचे दाम न घेता गप्पगुमान काम करणारे अंशतः अनुदानित शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी मला दाखवून द्या .भारतात नोकरी देण्याचे काम राष्ट्रपती सुद्धा करू शकत नाहीत पण कायद्याने संस्थाचालकांना नोकरी देण्याचा अधिकार मिळाला आणि इथेच खरा घोटाळा झाला . हा अधिकार देताना डोळ्यासमोर भाऊराव पाटलांचा आदर्श होता पण आता संस्थाचालक कोण आहेत राजकारणी नाक्यावर नेत्यांच्या मागेपुढे लाळ घोटणारे शिक्षण क्षेत्रात काम करणारे अधिकारी हे आहेत . काही संस्था आणि संस्थाचालक अत्यंत चांगल्या पद्धतीने कार्य करतात हे सुद्धा मान्य करायलाच पाहिजे. परंतु २० २० लाख डोनेशन घेणारे,कर्मचाऱ्यांना घरी , शेतावर , गाडीवर ड्राइवर, स्वतः चा PA, इंग्लिश शाळेवर HM Manager,अश्या संस्थाचालकाची संख्या जास्त आहे.

एक संस्थाचालक महाशयांनी तर शासकीय अनुदानावर गायी घेतल्या शाळेवर गायी सांभाळतात गाईची सर्व सेवा म्हणजे शेण काढण्यापासून ते दूध साहेबांच्या घरी नेवून देण्यापर्यंतचे कामासाठी सकाळी एक आणि रात्री एका शिक्षकाची नेमणूक केली आहे.आणि विशेष म्हणजे गाय पालनाचे पुण्य मात्र साहेबांनाच मिळते बर. हे संस्थाचालक महाभाग या शिक्षकांचा वापर फक्त संडासात असणाऱ्या टमरेलसारखाच करतात शिक्षकांच्या पगारी तुंबवायच्या आणि त्या काढण्यासाठी मोठी रक्कम मागायची प्रशासनाला थोडीशी मलाई मिळते म्हणून ते ही खुश म्हणजे प्रशासकीय अधिकारी १० रुपये मागितले तर हे कर्मचाऱ्यांकडून १००० लुटतात.

शाळेवर नोकरी करणाऱ्यामध्ये यांच्या घरातले अर्धे लोक असतात . भाऊ बहीण भावाची बायको बहिणीचा नवरा साली साला पुतण्या भाचा आणि महत्वाचे म्हणजे हे कधीच शाळेवर फिरकत नाहीत आणि आले तरी राजेशाही थाटातच. दर महिन्याला इमारत भाडे नावाखाली प्रत्येक कर्मचाऱ्यांना दर महिन्याला सरासरी एक हजार द्यावेच लागतात.पुन्हा आता नवा ट्रेंड सुरू आहे school bus त्यासाठी पुन्हा पैसा. online कामासाठी लागणारे सर्व खर्च शिक्षकांनीच करावेत असा दंडक आहे .

पुन्हा संस्थाचालक किंवा नातेवाईकांच्या वाढदिवस असल्यास हमखास सोनेच द्यावे लागते असा सारा विचार केल्यास कर्मचाऱ्यांना एका वर्षात ९ महिनाचाच वेतन मिळते संस्थाचालकच्या मागण्या पूर्ण नाही केल्या तर बिनबुडाचे आणि तथ्यहीन आरोप लावले जातात मग निलंबन चौकशी समिती नेमली जाते. चौकशी समिती हा एक संशोधनाचा विषय आहे.

छत्रपती संभाजीनगर या एका जिल्ह्यात चौकशी समिती मधे एकच व्यक्ती आदर्श म्हणून सापडतो तो सुद्धा १५ वर्षापूर्वी सेवा निवृत्त झालेला आहे तो चालतो कारण नियमात वयाचा उल्लेख नाही बर आदर्श शिक्षक तोच,तोच आदर्श मुख्याध्यापक आणि चौकशी समितीचा निर्णय पण अगोदरच ठरलेला असतो मग कोर्ट प्रकरण सुरू होते. म्हणजेच संस्थाचालकाचे म्हणणे नाही ऐकले तर चौकशी समीती लागलीच समजा.जे चौकशी समिती सदस्य असतात ते देवून घेवून चौकशी करतात म्हणजे आमचे ऐकले नाही तर लावतो चौकशी.म्हणजेच शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा कानपट्टी वर बंदूकच आहे कायममहात्मा फुले यांनी शेतकरी कसा नागवला जातो हे त्यांच्या लिखाणातून स्पष्ट केले अगदी तसेच साहित्य शिक्षण क्षेत्रात निर्माण होईल असे वाटते .शिक्षक हा अत्यंत भित्रा मध्यमवर्गीय प्राणी आहे .

नोकरी लागली की तो एक कोश तयार करतो. आणि घाबरत घाबरत कधी शासनाला कधी कधी प्रशासनाला आणि कायमपणे संस्थाचालकाला घाबरत असतो शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना शासन प्रशासन आणि संस्थाचालक पोटावरच मारतात त्यांची अडचण अशी आहे की त्यांचे प्रतिनिधी ज्यांना त्यांनी निवडून दिलेले आहे ते काहीच न करता चुप्पी साधत असतात.येत्या कालावधीत शिक्षकाच्या अनुदान आणि पेंशन आणि संस्थाचालक यांच्याकडून होणारा आर्थिक व मानसिक त्रास यामुळे आत्महत्त्या वाढणार आहेत.

बुद्धीजीवीची आत्महत्त्या शासनाला परवडणार नाही याकडे शासनाने जाणीवपूर्वक लक्ष द्यावे आणि उपाययोजना कराव्यात ही नम्र अपेक्षाउपाययोजना १. गेल्या २५ वर्षापासून सुरू असलेला अनुदान खेळ संपवून १००%अनुदान द्यावे.२. पेन्शन चे टेन्शन कमी करावे ३. चौकशी समितीच्या कलमात संशोधन करून निर्णय घ्यावा.




**भाई चंद्रकांत चव्हाण**

9890578751

जिल्हा सचिव मराठवाडा शिक्षक संघ छत्रपती संभाजीनगर